......पुलींदी,

तू कशी आहेस हे विचारायचा आता मला अधिकार नाही. माझी तेवढी लायकीच नाही. कदाचित हे पत्र मी नुसतंच लिहीन आणि कधी तुला पाठवणारही नाही. काही रंग आपण नुसतेच खलवतो, पण प्रत्यक्ष चित्राला कधी त्याचं बोटही लावत नाही; तसंच आहे हे काहीसं.

लहानपणी तांदळाच्या पिठीचा, सातूचा रंग बनवून गेरू चढवलेल्या डालींवर मी चित्रं काढायचो. तेव्हा हातसडीला मदत न करता उगीच वेळ वाया घालवतो हा पोरगा म्हणून आजी मला झोड झोड झोडायची. खारीचे केस जमवून साचेबंद कुंचले बनवायचो. प्रमाणबुद्धी मला उपजत होती. पुढे होळीला ठाठ्या बाजार भरायचा तेव्हा आक्ख्या पाड्याला उधाण यायचं. तरुण पोरं खास पोरी पटवण्यासाठी माझ्याकडून तऱ्हतऱ्हेच्या चीजवस्तू रंगवून घ्यायची. सांबराच्या शिंगापासून ते अबईच्या बियांच्या चपलीहारापर्यंत कशावरही माझ्याकडून कोरीव नक्षी काढून घ्यायची. त्यांच्या आयुष्याची पुरी भीस्त माझ्या हातच्या कलेवर विसंबून आहे हे तेव्हा कुठे ठाऊक असायचं मला. पोरगी पटली तर मला दुवा लागायच्या आणि नासली तर माझ्या कलेचं कलेवर धांदरकड्याच्या प्रवाहात छकलं उडवत वाहत जाताना दिसायचं. मी वयात आलो आणि ठाठ्या बाजारचा मला अर्थ समजू लागला. आपल्या नक्षीवर भाळून आजवर कितीतरी प्रेमी जोडप्यांचं सूत जुळलंय, आता तर थेट आपण या खेळात उतरलोय म्हटल्यावर सांगता सोय नाही. जमिनीवर राहायची शक्यताच नव्हती. कसं कोण जाणे, कदाचित चित्रांमुळे असेल पण मला बारकाव्यांनिशी कुठलीही गोष्ट न्याहाळत बसायला जास्त आवडते. इतरांना नेमकी ती हाताळायची घाई असते. स्त्रीच्या बाबतीत अनाहूतपणे माझं तेच झालं.

बिन्मेकपच्या नितळ सौंदर्याच्या, बिनचकचकाटाच्या सावळ्या तरतरीत स्त्रिया जेव्हा माझ्या चित्रांमधून रेखाटल्या गेल्या तेव्हा सुंदरघाटात शूटिंगसाठी आलेल्या गगना गुलझारपासून मायूस ग्रोफरपर्यंत सगळ्यांचं लक्ष त्यांनी खेचून घेतलं. वेधून नाही खेचूनच घेतलं म्हणेन. ऐन बाविशीचा होतो मी फक्त. तरी सिनेमाची कामं देऊ लागले ते मला. पण एक फोन फिरवायला विसरवाडीपर्यंत पायपीट करत जावं लागे. सुदैव एवढंच की बर्डीपाड्यात लांबडी गाडी पाठवू लागले ते माझी चित्रं घेऊन जायला. एका अडाणी अरण्यवासी मुलासाठी केवढी अविश्वसनीय गोष्ट होती ती. भिली भाषा बोलणाऱ्या, तीरकामटा लावून

हिंडणाऱ्या आपल्या लोकांना फक्त एवढाच फरक पडला होता की आता हा पठ्ठ्या ठाठ्या बाजाराला लागणारी चित्रं रंगवेनासा झाला होता. एक गॉगलवाली बाई आणि बोकडासारखी दाढी ठेवलेला बाबा आला आणि पोराला बिघडवून चित्रं घेऊन गेला. पाडाभर लोक कुजबुजायचे. पोरगं हातचं जाण्याआधी त्याचे चार हात करा कोणीतरी बापाचे कान फुंकले.

चंद्र सूर्यासाक्षीने निसर्गाला सर्वस्व मानणारी, कुठल्याच मूर्तीत न अडकणारी, सैराट्या जातीपातींना अजिबात बोकाळू न देणारी, खुल्या नातेसंबंधांची आपली ही मोकळी ढाकळी सोपी संस्कृती मला पूर्वीपासूनच वेगळी वाटायची. विचित्र नाही सुचित्र भासायची. निदान चार बुकं शिकलेली मुलगी निवडावी एवढी तरी माफक अपेक्षा मी यशाच्या वाटेवर करूच शकत होतो. मी तेच केलं आणि तू आलीस. हिला काय वाटत असेल यापेक्षा ही किती सोसू शकेल याचाच मी माझ्याही नकळत जास्त विचार केला. कलाकाराचा स्वार्थ म्हण किंवा पुरूषाची गृहितकं म्हण. घडलं ते असं घडलं.

मी तुझ्याशी कधीच वाईट वागलो नाही पण हेही कबूल करतो की तुला हवं तसं कधीच वागलो नाही. रंगांचं गारुड चढलेल्या माझ्या अंतरंगावर अंधारी प्रणयाचा असा काय ठसा उमटणार! नाही नाही, स्त्री म्हणून तू परिपूर्ण होतीस; पत्नी म्हणून तर सर्वस्व ओवाळून टाकायचीस पण 'वासनेने कला हतबुद्ध होत जाते' असं आतून वाटत राहायचं मला. तुझी उष्ण स्तनाग्र माझ्या बोटांना शिवशिवायला आयुष्यभर तडफडत राहातील, तुझी तप्त कानशीलं माझ्या ओठांना शोषून घ्यायला पंचप्राण गोठवून ठेवतील, तुझ्या सर्वांगाचा दाह माझ्याविना तुला उणापुरा जन्म जाळत राहील हे सगळं सगळं माझ्या बुद्धीपर्यंत पोहोचायचं पण हाताने स्पर्श नाही, केवळ चित्र उमटायचं! वेड लागलं होतं मला रंगांचं, इतर कुठलाही संग त्यापुढे फिका पडेल एवढं गडद वेड! देवाच्या दयेनं बाप झालो, कुठलंच कर्तव्य म्हणून नाही, अथवा पौरुष सिद्ध करायचं म्हणून तर अजिबात नाही. त्या मुलाचा पायगुण असेल, माझ्या चित्रांना सिनेमांच्या पोस्टर्ससाठी, सरकारी अभियानांसाठी ढिगा ढिगाने मागणी येऊ लागली. चिखलराडा तुडवून एवढी चित्रं वेळेत कशी पोहोचवणार होतो!

मुंबईला जायचं अचानक ठरवलं. येताना बाळाला घेऊन आलो, बाळ तुझं होतं की माझं होतं वगैरे मनाला शिवलंही नाही, दिसला तो त्याच्या नसानसात ठासून भडकलेला माझ्या रक्ताचा लाल रंग. जे अडाणी

आयुष्य मी जगलोय ते त्याच्या वाट्याला येऊ नये म्हणून सोबत आणलं त्याला. तुझा विचार करायला वेळ नव्हता, छबूड्याची आई म्हणजे माझी ताई होतीच की पाड्यात तुझ्यासाठी. त्यातच तू त्या चळवळीच्या कामालाही जाऊ लागली होतीस म्हटल्यावर मी निर्धास्त निघालो.

शहरवाल्यांची चित्रं पाहिली ती बॉम्बे आर्ट गॅलरीत. नुसत्या हाताने चित्रं काढायचा जमाना गेला आता हे मायानगरीत पाऊल ठेवल्याक्षणीच समजलं मला. मी काढलेल्या एकाच चित्राची किती वेगवेगळ्या आकारात पोस्टर्स बनवली होती. रस्त्यावरच्या डिव्हायडरपासून ते सिनेमाच्या प्रीमियरपर्यंत जागोजागी तीच चित्रं, त्याच साध्या स्त्रिया, तेच हिरवे रंग, उपयोजन मात्र वेगवेगळे.

लिहिता वाचता न येणाऱ्या मला या रंगांत टिकून राहायचं असेल तर पुरेपूर मेहनत करावी लागेल, स्पष्ट होतं. शिकवणारं कुणीच नव्हतं कारण जो तो स्पर्धेत रुतला होता. पुन्हा एकदा निरीक्षणाची देणगी कामास आली. आणि समजून चुकलं मला, की का माझी चित्रं यांना जगावेगळी वाटतात ते! त्यांच्या जगात माझ्या जगातलं नव्हतंच काही. स्वच्छ हसणाऱ्या सावळ्या चेहऱ्याला कुठल्याच मिलीयन डॉलर लिपस्टिकची गरज नव्हती. वेताच्या डाल्या विणणाऱ्या माझ्या चित्रातल्या कातकरी स्त्रिया उगीच त्यांना अर्धनग्न आणि आकर्षक वाटायच्या. अंगभर गरिबी आहे म्हणून फाटकी मळकी नेसु गुंडाळलीयेत असा भिकार आभास नसायचा माझ्या पात्रांमध्ये कधीच, उलट अरण्याला शोभेसा पेहराव हा असाच देहस्नेही दिसतो, शक्तीची कामं करताना घाम सांभाळून घेतो हे माझे बारकावे त्यांना आवाक करायचे. त्यांच्या चित्रात उमटायची सिगारेटच्या धुराची वेटोळी, अलिशान गाड्यांनी सोडलेली प्रदूषणाची बंडाळी, दिसायची वाहत्या नदीकिनारी मान उंचावून गुर्मीत कारखाने फुंकणारी माजुरडी धुराडी, की जी बघून बघून त्यांचा त्यांनाच उबग यायचा. अगदीच घाई असेल तर ते त्याला वास्तववादी वगैरे म्हणून चालवून घ्यायचे. काहीतरी हटके काढण्याच्या नादात मग ते दाखवू लागले रिकामे रस्ते, द ड्रीम रोड वगैरे, किंवा समुद्रावर बांधलेले अधांतरी पूल आणि कधीकधी तर घरात कोंडून राहिलेली चंद्राकडे पहाणारी सेल्फीवेडी माणसं. मग मी त्यांना माकडाशी खेळणारं लहान पोर काढून दाखवलं, त्यांना ते अफाट क्रेझी वाटलं. गारुड्याच्या तालावर डोलणारा नागोबा चितारून दाखवला, तो त्यांना लाइव्हली वाटला. मी त्यांना दाताने ऊस उपटणारा मिशी-पागोटंवाला रंगवून दाखवला ते तर त्यांना जाम इकोफ्रेंडली वाटलं. तेही चित्रं काढायचे, मीही चित्रंच काढायचो. पण माझं जग हिरवं होतं, त्यांचं जग करडं होतं. माझं जग वाहतं होतं,

नाईलाजाने त्यांचं जग तुंबलेलं होतं. माझं जग कुणी सांगायच्याही आधीपासून आत्मनिर्भर होतं. त्यांचं जग असंतुलनाच्या खाईत केव्हाचं भिरभिरत होतं.

विषवल्लीच्या सहवासाने वटवृक्षदेखील डळमळीत होतो म्हणतात, तसंच माझं झालं. रोज रोज बाजाराची गरज भागवण्यासाठी मी हिरवी चित्रं ओतत राहिलो, आयुष्यभर अभय देणाऱ्या आकाशाची निळाई दोन पैशांसाठी गहाण ठेवली आणि नको तेच झालं. माझ्या चित्रातला ताजेपणा एके दिवशी उडून गेला. रंग ओले व्हायचे पण मी आतून कोरडाच असायचो. कुठेतरी वाटायचं की आपल्या आतून काहीतरी कायमचं संपून गेलंय, कुठेतरी रानवाऱ्यात विरून गेलंय. हजारदा वाटायचं की मागे फिरावं, पाड्यात परत यावं पण यशाची नशा जीवघेणी असते. जसं वासनेला फक्त आपलं उद्दिष्ट ठाऊक असतं तसं वंचनेला स्वीकृतीचं धारिष्ट्य नसतं! मी फक्त रंग खलवत राहिलो. आयुष्य छटा दाखवत गेले.

गेले चौदा दिवस कसे काढलेत ते माझं मला माहीत. मी भरपूर प्रयत्न करतोय आता आपल्या बाळाचा खोकला थांबवण्यासाठी. कालच प्लास्टिकमध्ये माणसं गुंडाळून नेताना पाहिली आणि पुढचं मला न बोलता आलेलंच बरं.

जगलो वाचलो इथे तरी परत पाड्यात येणार नाही. ज्या अरण्याने मला रंग दिले ते मला परत या रूपात स्वीकारेल का याची खात्री वाटत नाही. स्वीकारलंच तरी कशावरून आता मला डोंगराआडून उगवणारी अदृश्य विकासाची धुरकांडी दिसणार नाहीत. ती आणखी नजरेच्या टप्प्यात यावीत म्हणून कशावरून मी झाडं छाटत सुटणार नाही. माझं माझ्या पाड्यावर खरं प्रेम असेल तर आता मी जागीच थांबलेलं बरं, निदान माझ्या माणसांच्या भल्यासाठी तरी पाड्याकडे न परतलेलंच बरं. झालं ते पाप खूप झालं. तुला तोंड दाखवण्याइतपत पुण्य आता माझ्या गाठीशी नाही. दुसऱ्याच्या पैशावर पोसलेली ही या शहरातली मायावी दुनिया सर्वार्थाने पांगळी आहे. हाताला पाहिल्यासारखं काम मिळेलंच याची थोडीही खात्री नाही. जे कधीच नव्हतं करायचं तेच करून दिवस काढावे लागू शकतात. मुताऱ्यांबाहेर सार्वजनिक भिंतींवर जनजागृतीची चित्रं तरी रंगवायचं काम मिळतंय का ते बघतो आता.

हे जग परत कधी ताळ्यावर येईल ते आता कोणीच नाही सांगू शकत. आणि नवं ताळतंत्र तरी कितपत ओरबाडू धाटणीचं असेल हेही याहाआईलाच ठाऊक. कारण झटपट लस शोधा, पृथ्वीवरच्या साडेसातशे कोटी लोकांना एकदाची ती टोचा, त्वरेने बंदुका उचला आणि शक्य तितक्या लवकर या ना त्या समूहाचा सूड घ्या असं काहीसं विनाशकाले विपरीत बुद्धी वारं जगभर सोसाट्याने वाहतंय. श्रीमंतांनी जगभर पसरवलेला हा आजार अजूनही माणसाला मोहाच्या गरिबीतून बाहेर नाही काढू शकला. विश्वशांती प्रस्थापित करणारं, विश्वकल्याणाची दिशा दाखवणारं असं एकही प्रशांत नेतृत्व आजवर तरी या कठीण काळात नजरेस पडलं नाही. जागतिक आरोग्य संघटनेने मात्र "कृष्णं वंदे जगद्गुरू"चा अखंड नारा लावलाय. भारतच आता जगाला दिशा वगैरे दाखवेल असं त्यांनी जवळपास घोषित केलंय. ते खरं ठरो.

माझ्या खूप खूप लाडक्या छबूडीला गोड पापा! स्वतःची काळजी घे पुलींदी. कायम तुझं आख्खं नावच घेत आलो, आता तेच नाम माझ्या उरल्या सुरल्या आयुष्याला विभक्ती प्रत्यत देत राहील हे निश्चित! जमलं तर माफ कर मला पुलींदी.

- तुझा रंगवेडा

(सदर पत्र हे प्राजक्ता गव्हाणे लिखित 'कोरोण्यकांड' या कादंबरीतील आहे.)

Book available on : https://www.amazon.in/dp/B08C499LGB

कोरोण्यकांड